MANGO RESEARCH SUB CENTRE RAMESHWAR, Po. Vijaydurg,
Tal. Deogad, Dist. Sindhudurg

www.dbskkv.org

आंबा संशोधन उपकेंद्र
रामेश्वर, पो. विजयदुर्ग,
ता.देवगड, जि. सिंधुदुर्ग

Mobile : 9370975818
mrscrameshwar@gmail.com
भ्रमणध्वनी : ९३७०९७५८१८

जा.क्र./आंसउके/आस्था/२०५/२०२३ दिनांक 31/07/2023

प्रति,

मा. प्रभारी अधिकारी,
कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष,
डॉ. बा. सा. कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली,
जि. रत्नागिरी.

**विषय:—मजूर पदाची कामे ठेका पध्दतीने करण्यासाठीचे दरपत्रक मागणीपत्र पहिली मुदतवाढीसह विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत....**

संदर्भ:—जा.क्र./आसउके/रामेश्वर/२०४/२०२३, दिनांक 31/07/2023

महोदय,

उपरोक्त सदंर्भिय विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, आंबा संशोधन उपकेंद्र, रामेश्वर, पो. विजयदुर्ग, ता. देवगड जि. सिंधुदुर्ग येथे मजूर पदाची कामे ठेकापध्दतीने करुन घेण्यासाठीचे दरपत्रक मागणीपत्र सोबत जोडून पाठविण्यात येत असून कृपया विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे ही विनंती.

आपला विश्वासू

सोबत : वरीलप्रमाणे

(व्ही. पी. दामोधर)
**प्रभारी अधिकारी,**
आंबा संशोधन उपकेंद्र, रामेश्वर,
ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग.

MANGO RESEARCH SUB CENTRE
RAMESHWAR, Po. Vijaydurg,
Tal. Deogad, Dist. Sindhudurg
Mobile : 9370975818

www.dbskkv.org
mrscrameshwar@gmail.com

आंबा संशोधन उपकेंद्र
रामेश्वर, पो. विजयदुर्ग,
ता.देवगड, जि. सिंधुदुर्ग
भ्रमणध्वनी : ९३७०९७५८१८

जा.क्र. आंसंऊके/रामेश्वर/दरपत्रक/२०४/२०२३ दिनांक : ३१/०७/२०२३

प्रति,

............................
............................
............................
............................

विषय: आंबा संशोधन उपकेंद्र,रामेश्वर येथील प्रक्षेत्रावरील मजूर पदाची विविध कामे ठेका पद्धतीने काम करण्यासाठी इच्छुक ठेकेदारांनी दरपत्रक देण्याबाबत

महाशय,

आंबा संशोधन उपकेंद्र, रामेश्वर, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग या कार्यालयाच्या प्रक्षेत्रावरील माहे आगस्ट २०२३ ते नोव्हेंबर २०२३ या कालावधीमधील मजूर पदाची विविध कामे ठेका पद्धतीने करून घेणे प्रस्तावित असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणेआहे.

| अ.क्र | कामाचा तपशिल |
|---|---|
| १ | नवीन आंबा लागवडीमधले गवत काढणे, उचलणे,झुडपे, वेली तोडणे, साफसफाई करणे तसेच पावसाळा संपल्यावर पाणी देणे. |
| २ | गट क्र. ५,६ ,११, १७ व १८ मधले गवत काढणे, उचलणे, झुडपे वेली तोडणे,साफसफाई करणे तसेच वाळलेल्या रोगट फांद्या काढणे व बांडगुळ काढणे. |
| ३ | कार्यालयीन कामे करणे. तसेच विविध प्रायोगिक कामासाठी मदत करणे व इतर कार्यालयीन कामात मदत करणे. |

उपरोक्त तपशिलाप्रमाणेची मजूर पदाची कामे ठेकापद्धतीने करून देण्यासाठी पुरविण्यास इच्छुक ठेकेदाराने आपण प्रती दिन व प्रती युनिट काय दराने मजूर पुरवाल हे या कार्यालयास दि. ०७/०८/२०२३ पर्यंत सिलबंद पाकिटातून कळवावे. कामासंबधीची अटी व शर्ती ज्यांना मान्य असतील अशा कंत्राटी मजुरांनी/ व्यक्तींनी दरपत्रके द्यावयाची आहेत.

आपला विश्वासू

उद्यानविद्यावेत्ता
आंबा संशोधन उपकेंद्र, रामेश्वर,
ता. देवगड जि. सिंधुदुर्ग.

प्रत माहितीसाठी :

१.मा. तहसिलदार, तहसिलदार कार्यालय, देवगड, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग.
२.मा. सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, रामेश्वर, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग.
३.मा. सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, विजयदुर्ग, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग.
४.मा. सरपंच, ग्रामपचायत कार्यालय, गिर्ये, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग.
५.नोटीस बोर्ड, आंबा संशोधन उपकेंद्र, रामेश्वर.

**ठेका पध्दतीने करावयाच्या कामासाठीचे शर्ती व अटी**

१. ठेक्यातील कामे ही ठेकेदारांनी संबंधीत कृषि पर्यवेक्षक/कृषि सहाय्यक यांचे सूचनेनुसार समाधानकारकरित्या करावयाची आहेत.
२. अर्धवट व असामाधानकारक कामाचे देयक पारित केले जाणार नाही
३. प्रक्षेत्रावरील कामे करणेसाठी लागणारी हत्यारे ठेकेदारांनी स्वत: पुरविणेची आहेत.
४. फवारणी पंप, पाणी, बुरशीनाशके तणनाशके इत्यादी साधने या कार्यालयाकडून दिली जातील.
५. ठेक्याची कामे कार्यालयीन वेळेतच पूर्ण करणे ६ चालू ठेवणे बंधनकारक आहे.
६. ठेक्याची कामे करताना प्रक्षेत्रातील इतर लागवड व इमारतीला इजा ६ नुकसान झाल्यास त्यांची भरपाई करुन घेतली जाईल.
७. ठेक्याच्या कामगारांना काम करताना अपघात किंवा इजा झाल्यास त्याची जबाबदारी ठेकेदारावर राहील.
८. ठेक्यातील कामगारांना भविष्यात विद्यापीठ सेवेत सामावुन घेण्याबाबत कोणत्याही प्रकारचा संबंध राहणार नाही.
९. ठेक्याचे काम समाधनकारक रित्या झाल्यानंतर चालू कामाचे/पूर्ण कामाचे कामाच्या प्रमाणात देयक या कार्यालयाकडून प्रत्येक महिन्याच्या १५ ते २० व ०१ ते ०५ तारखेदरम्यान अदा करण्यात येईल.
१०. आर्थिक वर्षात आपले उत्पन्न प्रमाणित उत्पन्नापेक्षा अधिक असल्यास आपणांस नियमानुसार टी. डी. एस. व आयकर भरावा लागेल.
११. कामाच्या स्वरुपामध्ये परिस्थितीनुरुप बदल करावयाचा हक्क निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवले आहेत.
१२. एक किंवा सर्व दरपत्रके स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे हक्क निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवले आहेत

उद्यानविद्यावेत्ता
आंबा संशोधन उपकेंद्र, रामेश्वर,
ता. देवगड जि. सिंधुदुर्ग.